# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उद्यान/ ७३० /२०२३-२४

दिनांक :- 22/03/2024

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहिर आवाहन प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दि.24/03/2024 रोजी साजरा होणा-या होळी सणाच्या (Holi Festival 2024) पार्श्वभुमीवर नागरिकांनी कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करु नये याकरिता सोबत जोडलेले जाहिर आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(कल्पिता पिंपळे)
उप.आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र.मनपा/उद्यान/७३०/2023-24

दिनांक :-24 03/2024

## // जाहिर आवाहन //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, दि.२४ मार्च २०२४ रोजी साजरा होणा-या होळी सणाच्या (Holi Festival २०२४) पार्श्वभुमीवर नागरिकांनी कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करु नये. 'होळी'च्या कालावधीत वृक्षतोड होत असल्याचे आढळल्यास, सतर्क नागरिकांनी मिरा भाईंदर महानगरपालिका उद्यान विभागास +९१२२२८११७१०४ या क्रमांकावर संपर्क करावा.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ अंतर्गत कलम २१ अन्वये, वृक्ष प्राधिकरणाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणतेही झाड तोडण्यास / तोडण्यास कारणीभूत होणे, हा अपराध आहे. अनधिकृत वृक्षतोडीच्या प्रत्येक गुन्ह्यासाठी संबंधित व्यक्तिला कमीत कमी १ हजार ते पाच हजार रुपयापर्यंत दंड आकारण्याची तरतुद आहे. त्यासह एक आठवडा ते एक वर्षापर्यंत कैदेची शिक्षा देखील होऊ शकते.

आपल्या अवतीभवती असलेली निसर्गसंपदा जोपासणे आणि वृद्धिंगत करणे हे सर्व नागरीकांचे कर्तव्य आहे. आपणा सर्वांना प्राणवायू देणा-या झाडांचे, वृक्षांचे संरक्षण करणे आवश्यक आहे म्हणुन सर्व नागरिकांनी सहकार्य करावे.

तरी होळी सणानिमित्त सर्व नागरींकांनी वृक्षतोड न करता पर्यावरणपुरक गोष्टींचा वापर करुन आनंदाची होळी साजरी करावी.

(कल्पिता पिंपळे)
उप.आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner